महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

**जाक्र.शिउसं/पुणे/उमा-४०१**/मा.अ./२०२१ 1242 दिनांक:-०५/०१/२०२२

07 JAN 2022

प्रति,

**प्राचार्य/ मुख्याध्यापक**

उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालये (सर्व)

पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्हा

**विषय:-माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अन्वये आपल्या उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील सहाय्यक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नवे सादर करणे बाबत.**

**संदर्भ:-** माहितीचा अधिकार अधिनियम-२००५

नागरिकास प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामधून (कार्यालयांमधून) उपलब्ध माहिती मिळण्याकरिता सहाय्यक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी नियुक्त करणे संदर्भिय कायद्यान्वये बंधनकारक केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम २ (ज)(ब) मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटीत करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था म्हणजेच सार्वजनिक प्राधिकरण होय. यानुसार आपली शाळा हे एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५मधील कलम ५(१) नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून १०० दिवसांच्या आत या अधिनियमान्वये माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती देण्यासाठी त्यांच्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना यथास्थित केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५मधील कलम १९ (१) नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामधील केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याकडे अपिल करता येईल असे नमूद आहे.

म्हणजेच कलम २ (ज)(ब) मध्ये नमूद केल्या नुसार आपण एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहात. कलम ५(१) नुसार कार्यालयामध्ये आवश्यक असतील तेवढ्या राज्य जन माहिती अधिकारी यांना आपण पद्स्थापित केलेले असेलच. कलम १९ (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अपिल करणे आवश्यक असल्याने आपण आपल्या सार्वजनिक प्राधिकरणासाठी राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अधिकार्याची अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.

आपल्या कार्यालयाने केलेल्या नियुक्त्यांना जनतेस माहिती होईल अशी प्रसिद्धी द्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

07 JAN 2022

(औदुंबर उकिरडे)
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे